

# कलिंगड उत्पादन तंत्रज्ञान

डॉ. नेहा काळे
सहाय्यक प्राध्यापिका (विस्तार शिक्षण विभाग)

डॉ. अतुल मुराई
प्राचार्य

कु. प्रज्वल दरेकर
कृषि पदवी विद्यार्थी

कृषि महाविद्यालय, अचलोली, महाड

महाराष्ट्रामध्ये कलिंगड हे पिक उन्हाळी हंगामात घेतले जाते. महाराष्ट्रात कलिंगडाची लागवड अंदाजे ६६० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली जाते. कच्च्या कलिंगडाचा भाजी तसेच लोणच्यासाठी उपयोग केला जातो. कलिंगडाच्या रसाचे सरबत उन्हाळ्यात फार चविष्ट व थंडगार असते. या फळामध्ये फॉस्फरस ही खनिजे व अ, ब, क जीवनसत्वे काही प्रमाणात असतात.

### जमिन:

मध्यम काळी पाण्याचा निचरा होणारी जमिन या पिकास योग्य असते. या पिकाकरता जमिनीचा सामू ५.५ ते ७.०० योग्य असतो.

### हवामान:

पिकासाठी उष्ण व कोरडे हवामान आणि भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक असतो. वेलीची वाढ करण्याकरिता २४ अंश सेल्सियस ते २७ अंश सेल्सियस तापमान उपयुक्त असते. तापमानात कमी अधिक वाढ झाल्यास म्हणजेच १८ अंश सेल्सियसच्या खाली व ३२ अंश सेल्सियसच्या वर गेल्यास वेलीच्या वाढीवर व फळधारणेवर विपरीत परिणाम होतो, २१ अंश सेल्सियस पेक्षा कमी तापमान असल्यास बियांची उगवण होत नाही.

### लागवड हंगाम:

या पिकाची लागवड जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात केली जाते.

### बियाण्याचे प्रमाण:

कलिंगड लागवडीसाठी हेक्टरी २.५ ते ३ किलो बियाणे पुरेसे असते. पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम चोळावे.

### पूर्वमशागत:

शेतास उभी आडवी नांगरणी करून ढेकळे फोडून काढावी व एक वखरणी द्यावी. शेतात चांगले कुजलेले १५ ते २० गाड्या शेणखत टाकावे नंतर वखरणी करावी.

### लागवड:

कलिंगड लागवड बिया टोकून करतात कारण त्यांची रोपे स्थलांतर सहन करू शकत नाहीत. या पिकाची लागवड खालील प्रकारे केली जाते.

#### आळे पद्धत-

ठराविक अंतरावर आळे करून त्यात शेणखत मिसळून मध्यभागी ३-४ बिया टाकाव्यात.

#### सरी वरंबा पद्धत-

२ x ०.५ मिटर अंतरावर कलिंगडाची ३-४ बिया टोकून लावाव्यात.



#### रुंद गादी वाफ्यावर लागवड-

या पद्धतीत लागवड रुंद गादी वाफ्याच्या दोन्ही बाजूना करतात. त्यामुळे वेल गादी वाफ्यावर पसरतो व फळे पाण्याच्या संपर्कात न येत खराब होत नाहीत. यासाठी ३ ते ४ मी. अंतरावर सरी पाडून सरीच्या वगलेत दोन्ही बाजूंना १ ते १.५ मी. अंतरावर ३ ते ४ बिया टोकाव्यात.

### खत व्यवस्थापन:

५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश लागवडीपूर्वी द्यावा व लागवडीनंतर १ महिन्यांनी ५० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्यावा.

### पाणी व्यवस्थापन:

जमिनीच्या मगदुराप्रमाणे पिकास पाणी द्यावे व वेली वाढू लागल्यावर ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. उन्हाळी हंगामात पाण्याच्या साधारणपणे १५-१७ पाळ्या द्याव्या लागतात.

### आंतरमशागत:

बी उगवून वेल पूर्ण वाढीला लागेपर्यंत आजूबाजूचे सर्व तण काढून रान भूसभूसीत ठेवावे. रानातील मोठे तण हातांनी उपटून टाकावे. भारी जमिनीत बि पेरल्यानंतर पाणी देऊ नये. कारण अशा जमिनीत पाणी सुकल्यानंतर वरचा थर कडक होतो. अशा जमिनीस प्रथमता पाणी देऊन वाफसा आल्यानंतर बी टोकावे.

### वाण:

#### अर्का ज्योती-

ही संकरित जात असून फळ मध्यम ते मोठ्या आकाराचे फिकट हिरव्या रंगाचे व गडद हिरवे पट्टे असलेले असून गर गडद गुलाबी व गोड असतो ही जात

साठवणूक करिता व वाहतुकीस उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन ८०० क्विंटल मिळते.

### अर्का माणिक-

या जातीच्या फळांचा आकार अंडाकृती, साल पातळ हिरव्या रंगाची असून गडद हिरवे पट्टे असतात. फळाचे वजन ६ किलो पर्यंत असते. हेक्टरी उत्पादन ६०० क्विंटल मिळते.

### शुगर बेबी-

ही जात महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. फळ मध्यम आकाराचे ४ ते ५ किलोचे असून फळाचा रंग काळपट हिरवा असून गर लाल अत्यंत गोड असून बिया लहान असतात.

### न्यू हॅम्प शायर-

ही जात फळांची लवकर येणारी अंडाकृती आकाराची असून साल हिरव्या रंगाची व त्यावर हिरवे पट्टे असणारी असून गर गडद लाल व गोड असतो.

## रोग व्यवस्थापन:

- भुरी-

या रोगाची सुरवात पानापासुन होते. पानाच्या खालच्या बाजूस पिठासारखी बुरशी वाढते, नंतर ती पानाच्या पृष्ठभागावर वाढते. त्यामुळे पाने पांढरी दिसतात. रोगाचे प्रमाण वाढल्यावर पाने पिवळी पडून गळतात.

### उपाय-

डोनोकॅप किवा कार्बेन्डाझीम हे औषध ३० लिटर पाण्यात १० ग्रॅम या प्रमाणात मिसळून फवारावे. नंतर दर १५ दिवसांनी २ ते ३ वेळा फवारणी करावी.

- केवडा-

पानाच्या खालच्या बाजूला पिवळ्या भरकट रंगाचे ठिपके दिसतात नंतर पानाचे देठ व फाद्यावर यांचा प्रसार होतो.

### उपाय-

डायथेन झेड ७८.०२ % तीव्रतेची फवारणी करून हा रोग आटोक्यात आणता येईल.

- मर-

हा बुरशीमुळे होणारा रोग असून पिक फुलावर असताना या रोगाचा प्रादुर्भाव होतो. पाने पिवळी पडतात फुल गळ होऊन बेल निस्तेज दिसतात व कालांतराने मरतात.

### उपाय-

हा रोग जमिनीतील बुरशीमुळे होतो. त्यामुळे पेरणीपूर्वी १ किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम चोळावे.

## किड व्यवस्थापन:

- फळमाशी-

या माशीच्या अळीमुळे पिकाचे नुकसान होते. माशी फळांच्या सालीत अंडे घालते. त्यामुळे अळी फळातील गर खाते त्यामुळे फळं सडतात.

### उपाय-

कीड लागलेली व खाली पडलेली फळ नष्ट करावीत. पिकांवर व जमिनीवर मेलाथिऑन या औषधाचा १ टक्के तीव्रतेचा फवारा मारावा.

- तांबडे भुंगे-

बी उगवून वर आल्यावर त्यावर नारंगी तांबड्या रंगाचे भुंगेरे उपजिविका करतात.

- मावा-

हिरव्या किंवा काळ्या रंगाचे बारीक किडे पानातील रस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडून मलूल पडतात.
उपाय- किड दिसल्यास मेलाथिऑन औषध ०.१ टक्के या प्रमाणात फवारावे.

## काढणी:

कलिंगड फळ पूर्ण पिकल्यावर काढतात. नदीच्या पात्रातील फळे बागायतीपेक्षा लवकर तयार होतात. बी पेरल्यापासून ३ ते ३.५ महिन्यात काढणी सुरु होते व ३ ते ४ आठवड्यात पूर्ण होते. आकार व रंगावरून फळाची पक्वता ठरविने कठीण आहे. फळ तयार झाल्याची काही लक्षणे खालील प्रमाणे आहेत.



कलिंगड देठाजवळ बाळी सुकली कि ते तयार झाले असे समजावे. तयार फळ हाताने ठोकून पाहिल्यास 'बद' असा आवाज येतो. कच्चे असल्यास धातुच्या वस्तू ठोकल्यावर निघतो तसा आवाज येतो. कलिंगडाच्या जमिनीतील स्पर्श करणाऱ्या भागाचा पंधुरका रंग बदलून तो पिवळसर झाल्यास फळ तयार झाले असे समजावे. तयार फळावर हाताने दाब दिल्यास कर्रर असा फळातून आवाज येतो. फळ तयार असल्यास देठाजवळ लव अजिबात दिसत नाही. देठ अगदी गुळगुळीत दिसतो.

## उत्पादन:

कलिंगडाचे हेक्टरी उत्पादन २५० ते ३०० क्विंटल येते.

(संपर्क: +९१ ८२०८८२६९४२
+९१ ८९७५६३४४४३)

★ ★ ★